**<u>ठळक बातम्या</u>**

- पुद्दुचेरीसह चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या मतमोजणी

- नवी दिल्लीत एका इमारतीत लागलेल्या आगीत ९ जणांचा मृत्यू

- पश्चिम आशियामधल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलचं अधिक उत्पादन घेण्याचा ओपेकचा निर्णय

**आणि**

- माली इथं सुरक्षा रक्षकांनी केलेल्या हवाई हल्ल्यात दोनशे हल्लेखोर ठार

<><><><><>

पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीसाठी उद्या मतमोजणी होणार आहे. आसाम मध्ये १२६, केरळ मध्ये १४० आणि पुदुच्चेरी मध्ये ३० जागांसाठी तर तामिळनाडू मधल्या २३४ आणि पश्चिम बंगाल मधल्या २९४ पैकी २९३ जागांसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणी होणार आहे. मतमोजणीसाठी सर्वत्र यंत्रणा सज्ज आहेत.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाने अतिरिक्त निरीक्षक आणि पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मतमोजणी निरीक्षकांच्या मदतीसाठी अतिरिक्त १६५ निरीक्षक तर मतमोजणी केंद्राच्या आसपास सुरक्षेसाठी ७७ अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी इथंही चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आसाम मध्ये राज्य सशस्त्र पोलिसांच्या ९३ तुकड्या विविध जिल्ह्यांमध्ये आधीच तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान पश्चिम बंगालच्या फाल्टा विधानसभा मतदारसंघातल्या सर्व २८५ मतदान केंद्रांवर २१ मे रोजी फेरमतदान घेण्याचे निर्देश भारतीय निवडणूक आयोगानं दिले आहेत. या मतदारसंघाच्या मतांची मोजणी २४ मे रोजी केली जाईल. फाल्टा मतदारसंघात २९ एप्रिल रोजी झालेल्या मतदानाच्यावेळी अनेक मतदान केंद्रांवर मतदानप्रक्रियेशी निगडित गंभीर स्वरूपाचे अपराध झाल्याच्या आणि लोकशाही प्रक्रियेचं मोठ्या प्रमाणावर उल्लंघन केल्याच्या घटना घडल्यानं आयोगानं हा

निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगाल मध्ये २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यात मतदान झालं होतं तर तामिळनाडू मध्ये २३ एप्रिल रोजी एका टप्प्यात आणि आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी इथं ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान झालं होतं.

<><><><><>

जमैका, सुरीनाम, त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या दौऱ्यावर असलेले परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आज सकाळी जमैकाची राजधानी किंग्स्टन इथं पोहोचले. जमैकाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री कामिना जे. स्मिथ यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. पुढील दोन दिवसांत जमैकातील प्रमुख नेते, व्यापारी समुदाय आणि भारतीय वंशाच्या नागरिकांशी संवाद साधण्यास उत्सुक असल्याचं डॉ जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

देशातले विरोधी पक्ष सातत्याने निवडणूक आयोग, सरकारी संस्था, ईव्हीएम, आणि माध्यमांवर दोषारोप करतात, आता ते न्यायव्यवस्थेलाही लक्ष्य करत असल्याची टीका भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी केली आहे. विरोधी पक्ष लोकशाहीच्या गाभ्यावरच हल्ला करत असल्याचं रिजिजू समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. यावेळी त्यांनी आधीच्या सरकारांवर टीका केली.

<><><><><>

एम टी सर्वशक्ती या एलपीजी वाहून नेणाऱ्या भारतीय जहाजाने आज होर्मुजची सामुद्रधुनी ओलांडली. या जहाजावर ४६ हजार ३१३ मेट्रिक टन एलपीजी गॅस आहे. विशाखापट्टणम इथं १३ मे रोजी हे जहाज दाखल होईल. सर्व भारतीय जहाज आणि खलाशी सुरक्षित असल्याचं बंदरे जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

नवी दिल्लीत आज सकाळी विवेक विहार इथल्या एका इमारतीत आग लागून झालेल्या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब ताबडतोब घटनास्थळी रवाना झाले. अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी १५ जणांची सुटका केली असून काही जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आग पूर्णपणे नियंत्रणात आणण्यात आली असल्याचं अग्निशमन दलानं सांगितलं. मात्र आगीचं कारण अद्याप कळू शकलं नाही. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींच्या प्रकृतीत

लवकरात लवकर सुधारणा होवो अशी प्रार्थना केली आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल तरणजित सिंग संधू यांनी देखील शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

मध्य प्रदेश मध्ये जबलपूर इथं बार्गी धरण परिसरात जहाज उलटून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १३ वर पोहोचली आहे. बचाव पथकानं आज एका पाच वर्षीय मुलाचा आणि त्यांच्या काकांचा मृतदेह बाहेर काढला. त्यामुळे या दुर्घटनेनंतर बेपता झालेल्या सर्व १३ जणांचा शोध आता लागला असल्याचं पोलिसांनी सांगितलं. या बचावकार्यात आग्रा इथून विमानानं आणलेल्या लष्कराच्या सुमारे २० पाणबुड्यांचा समावेश असलेली पथकं, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान आणि स्थानिक पाणबुड्या यांचा समावेश होता. वादळामुळे जहाज भरकटल्यानं हा अपघात झाला, त्यावेळी त्यात ४१ प्रवासी होते, त्यापैकी २८ जणांना वाचवण्यात यश आलं होतं.

<><><><><>

बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी आज नवी दिल्ली इथं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. सरकारच्या विकसित भारत मोहिमेसंदर्भात या भेटीत चर्चा झाल्याचं चौधरी यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे सांगितलं. तसंच बिहार मधे रेल्वे पायाभूत सुविदा आणि विकासाला चालना देण्यासंदर्भात वैष्णव यांच्याशी चर्चा केली असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

पश्चिम आशियामधला संघर्ष अद्याप सुरुच असल्यानं ओपेक अर्थात पेट्रोल निर्यात करणाऱ्या देशांच्या संघटनेनं येत्या जून महिन्यात देखील पेट्रोलचं अधिक उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला आहे. सात ओपेक प्लस देशांनी पुढील महिन्यात तेल उत्पादनाचं लक्ष्य दररोज अंदाजे १ लाख ८८ हजार बॅरल इतकं वाढवायला तत्वतः सहमती दर्शवली आहे. संयुक्त अरब अमिरात अलीकडेच या गटातून बाहेर पडल्यानंतर आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीवर मोठ्या प्रमाणावर निर्बंध येत असल्यानं हे पाऊल उचलण्यात आलं आहे. ओपेक संघटनेत आता २१ सदस्य आहेत.

<><><><><>

आज  जागतिक माध्यम स्वातंत्र्य दिवस. दरवर्षी ३ मे रोजी माध्यम स्वातंत्र्य दिवस जगभरात साजरा केला जातो. "नव्या निडर जगातले वार्तांकन: कृत्रिम प्रज्ञेचा माध्यम स्वातंत्र्य आणि प्रसार माध्यमांवरील प्रभाव" असा यंदाच्या माध्यम स्वातंत्र्य दिनाचा विषय आहे. या दिवसाच्या निमित्तानं  माध्यम स्वातंत्र्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण केली जाते, तसंच या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांच्या बलिदानाची देखील आठवण केली जाते. हा दिवस अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा सन्मान आणि माहिती मिळवण्याच्या अधिकाराचं  महत्त्व विशद करतो. सध्याच्या युगात भविष्याच्या दृष्टीनं माहितीची परिसंस्था बळकट करताना डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवाधिकार आणि पत्रकारिता या सर्वांना एकाच धाग्यात गुंफून अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दलची वचनबद्धता दृढ करण्याच्या दृष्टीनं या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे.

**<><><><>**

पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीट यूजी आज देशभरात होणार आहे. नियोजित वेळेनुसार दुपारी दोन वाजता परीक्षा सुरू होणार असून संध्याकाळी पाच वाजता ती संपेल. विद्यार्थ्यांनी वेळेआधी अर्धा तास परीक्षा केंद्रांत पोहोचणे अपेक्षित आहे.

**<><><><>**

महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातल्या नसरापूर इथं बालिकेवरल्या अत्याचार आणि हत्येचा राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी निधेष केला आहे. ही घटना अतिशय  क्लेशदायक असून मानवतेवरला कलंक आहे, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या. याप्रकरणी महिला आयोगाने राष्ट्रीय बालहक्क सुरक्षा आयोगाला पत्र लिहलं असून तात्काळ कारवाई करण्याची विनंती केल्याचं  रहाटकर यांनी सांगितलं.

**<><><><>**

माली इथं सुरक्षारक्षकांनी केलेल्या हवाई हल्ल्यात दोनशे हल्लेखोर मारले गेल्याचं मालीमधल्या सरकारी वृत्तसंस्थेनं कळवलं आहे.  हे हल्लेखोर सीमाभागातून मालीमधे  शिरले होते आणि मोठा हल्ला घडवून आणण्याचा त्यांचा कट होता, असं मालीच्या सुरक्षा  दलांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात शस्त्रास्त्रांनी भरलेले ट्रक आणि ६० दुचाक्या नष्ट करण्यात  आल्या आहेत. २५ एप्रिलला या दहशतवादी गटाने मालीमधे हल्ला केला, या मालीचे संरक्षण मंत्री

जनरल सादियो कामारा आणि त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला. भारताने या हल्ल्याचा तीव्र शब्दात  निषेध केला तसंच कामारा यांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केलं.

**<><><><><>**

देशात  विविध ठिकाणी कालपासून वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे.

**पश्चिम बंगाल**च्या दक्षिण भागात वादळी वारे आणि पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागानं येत्या ४८ तासांसाठी ‘कालबैसाखी’ वादळाबाबत इशारा जारी केला आहे.

**मध्यप्रदेशा**त काल राजधानी भोपाळसह २० हून अधिक जिल्ह्यांत ताशी ३० ते ५० किलोमीटर वेगानं जोरदार वारे वाहिले.

हिमाचल प्रदेशची राजधानी सिमला इथं आज सकाळी ढगांचा गडगडाट आणि वाऱ्यासह पाऊस सुरू झाला. यामुळं शहरातील अनेक भागांत दृश्यमानता कमी झाली आहे.

राजस्थानमध्ये राजधानी जयपूरसह  अनेक जिल्ह्यांमध्ये काल संध्याकाळी  वादळ, धुळीचे वारे आणि पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा पहिला सामना सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात होणार आहे. हैदराबादमध्ये राजीव गांधी मैदानावर दुपारी साडे तीन वाजता सामन्याला सुरुवात होईल.

आजचा दुसरा सामना गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात होईल. अहमदाबाद इथे नरेंद्र मोदी मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

**//<><><><><>//**